# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

**दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई-४०००६५**

---

## मिडिया मॅनेजर हे पद कंत्राटी तत्वाने भरण्याबाबत जाहिरात

| | | |
|---|---|---|
| १ | **कार्यालयाचे नाव** | महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित. दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगांव (पू.), मुंबई - ४०० ०६५ |
| २ | **पदनाम व पदसंख्या** | मिडिया मॅनेजर - ०१ पद |
| ३ | **पदाचे स्वरुप व कालावधी** | कंत्राटी पध्दतीने ११ महिने |
| ४ | **सविस्तर जाहिरात व अर्ज उपलब्धतेचे ठिकाण** | **www.filmcitymumbai.org** व **www.maharashtra.gov.in** |
| ५ | **अर्ज पाठविण्याचे ठिकाण** | filmcitycao@gmail.com |
| ६ | **अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक** | दि.०१.०७.२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ७ | **निवड पध्दत** | मुलाखतीद्वारे |

अर्जाचा नमुना, पदाची अर्हता, अनुभव, अटी शर्ती यांचा तपशील **www.filmcitymumbai.org** **व www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातच अर्ज सादर करावा, अन्यथा आपल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. या संदर्भात कोणत्याही उमेदवाराची अंतिम निवड वा उमेदवारी कोणत्याही टप्यावर नाकारण्याचे पुर्ण अधिकार व्यवस्थापकीय संचालक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

स्वाक्षरी
व्यवस्थापकीय संचालक
म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

**दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई-४०००६५**

---

**<u>मिडिया मॅनजर हे पद तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वाने भरण्याबाबत.</u>**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ हे गोरेगांव (पूर्व) येथे कार्यरत असून महामंडळाच्या सुमारे ५२१ एकर जागेतील बाह्य चित्रिकरण स्थळे व स्टूडिओ चित्रपट, दुरध्वनी मालिका व जाहिराती यांच्या चित्रिकरणासाठी भाड्याने देण्यात येतात सद्यस्थितीत मुंबई व मुंबई उपनगरच्या परिसरात अनेक खाजगी चित्रिकरण स्थळे विकसित झाली आहेत. त्यामुळे महामंडळास व्यावसायीक स्पर्धेस तोंड द्यावे लागत आहे. निर्मात्यांना महामंडळाच्या परिसरात चित्रिकरणाच्या दृष्टीने अद्यायावत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा महामंडळाचा नेहमीचाच मानस आहे. याचाच भाग म्हणून मेकअप रुम / कलागारे यांचे अद्यावतीकरण तसेच इतर सुविधा व सवलतीही महामंडळाकडुन देण्यात येत आहे. सदर बाबी संबंधितांपर्यत पोहचविण्यास महामंडळास मर्यादा पडत आहे. ही बाब विचारात घेऊन महामंडळाकडून हाती घेण्यात येणारे प्रकल्प देण्यात येणाऱ्या सुविधा याबाबतची माहिती प्रसार माध्यमांद्वारे संबंधितांपर्यत पोहचविण्यासाठी पत्रकारिता व माहिती व जनसंपर्क क्षेत्रातील जाणकार व्यक्तीची मिडिया मॅनेजर म्हणून ११ महिन्यांसाठी कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी खालील प्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे.

१. **पदसंख्या** : १ (एक)

२. **अर्हता** : अ) पत्रकारिता Journalism अथवा Mass Communication या विषयातील मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी / पदविका
ब) किमान ३ वर्षाचा अनुभव
क) शासकीय विभागात काम केले असल्यास प्राधान्य.

३. **वित्तलब्धी** : पात्रता व अनुभव विचारात घेवुन ठराविक मासिक मानधन निश्चित करण्यात येईल.

**४. पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या :-**

१. महामंडळाकडुन हाती घेण्यात येणाऱ्या कर्मक्रमांची दृक व श्राव्य प्रसारमाध्यमांमध्ये जाहिरात व कार्यक्रमोत्तर प्रसिध्दी देणे.
२. महामंडळाची राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख निर्माण करण्यासाठी प्रसारमध्यमांद्वारे प्रयत्न करणे.
३. सोशल मिडियाद्वारे महामंडळाच्या कामकाजाची माहिती जनतेपर्यंत पोहचविणे.
४. जनसंपर्क विषयीचे कामकाज.
५. महामंडळाचा व्यवसाय वाढीस हातभार लावणे.

वरील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी दि.०१.०७.२०२२ पर्यंत शैक्षणिकि अर्हता, अनुभव वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्र, जर शासकीय सेवेत असतील तर सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाच्या पुराव्यर्थ आवश्यक त्या साक्षांकित कागदपत्रासह खालील पत्यावर किंवा **filmcitycao@gmail.com** या इमेल आयडीवर ऑन लाईन अर्ज करावा.

**महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या.,**
**दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५**

प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांपैकी उमेदवारांचा अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्याचे सर्व हक्क महामंडळ राखुन ठेवत आहे. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदवारांना यथावकाश कळविण्यात येईल.

व्यवस्थापकीय संचालक
म.चि.रं.व सां.वि.म.मर्यादित

# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई-४०००६५

---

## <u>अर्जाचा नमुना</u>

महामंडळातील "मिडिया मॅनेजर" हे पद कंत्राटी तत्वाने भरण्यासाठीचा अर्ज

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | |
| २ | जन्म तारीख | |
| ३ | पत्रव्यवहारासाठी पत्ता | |
| ४ | ई-मेल | |
| ५ | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ६ | शैक्षणिक अर्हता | |
| ७ | अनुभव | |
| ८ | सद्यस्थित कार्यरत असलेल्या कार्यालयाचा तपशिल व मिळत असलेले एकुण मानधन (वेतन) | |